आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१ ऑक्टोबर २०२५ - बुदवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- झिरो बॅलन्स बँक खातेधारकांना इंटरनेट आणि मोबाइल बँकिंग सुविधा मोफत मिळणार

- रेपो दरात कोणताही बदल न करता साडेपाच टक्के ठेवण्याचा रिझर्व बँकेचा निर्णय.

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांचा सहभाग / विशेष टपाल तिकिट आणि नाण्याचं केलं प्रकाशन

**आणि**

- आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेचा ५९ धावांनी पराभव करून भारताची विजयी सलामी

**<><><><><>**

झिरो बॅलन्स सुविधा असणाऱ्या बँक खातेधारकांना इंटरनेट आणि मोबाइल बँकिंग सुविधा मोफत देण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे. पतधोरण आढावा समितीच्या बैठकीतले निर्णय जाहीर करताना गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती दिली. ग्राहकांच्या सोयीसुविधा, बँकिग क्षेत्र मजबूत करणे, कर्ज पुरवठा वाढवणे, व्यवसाय सुलभता, परकीय चलन व्यवहार आणि रुपयाचे आंतरराष्ट्रीयीकरण याला चालना देण्यासाठी त्यांनी २२ सुधारणा जाहीर केल्या.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कोणताही बदल न करता साडेपाच टक्के ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेची द्वैमासिक पतधोरण आढावा बैठक आज मुंबईत झाली, त्यानंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती वार्ताहरांना दिली. पतधोरण समितीच्या सदस्यांनी एकमताने रेपो दर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला असं मल्होत्रा यांनी सांगितलं. स्थिर देशांतर्गत वाढ, महागाईचा कमी झालेला दर

आणि वाढती जागतिक जोखीम लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचं त्यानी सांगितलं....

**होल्ड- बाईट- गवर्नर**

उत्पादन आणि पुरवठ्यातली वाढ, वस्तू आणि सेवा कराची पुनर्रचना यामुळे महागाईचा दर आटोक्यात राखण्यात यश मिळेल असं ते म्हणाले.

चालू आर्थिक वर्षात महागाई दर २ पूर्णांक ६ दशांश टक्के तर जीडीपी वाढ ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहील असा अंदाज रिझर्व्ह बँकेने वर्तवला आहे. मार्जिनल स्टँडिंग फॅसिलीटी रेट ५ पूर्णांक ७५ शतांश टक्के तर स्टँडिंग डिपॉझीट फॅसिलीटी रेट ५ पूर्णांक २५ शतांश टक्के ठेवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पदावर शिरीषचंद्र मुर्मू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती तीन वर्षांसाठी असेल. शिरीष चंद्र मुर्मू सध्या रिझर्व्ह बँकेत कार्यकरी संचालक पदावर कार्यरत आहेत.

**<><><><><>**

दीर्घ काळ निष्क्रीय राहिलेली बँक खाती तसंच कोणताही दावा न करण्यात आलेल्या ठेवी आणि रकमा ग्राहकांना परत मिळाव्यात यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेनं एक योजना जाहीर केली आहे. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत या योजनेचा ग्राहकांना लाभ घेता येणार आहे. ग्राहकांनी त्यांची निष्क्रीय बँक खाती सक्रीय करावीत आणि बँकेतल्या दावा न केलेल्या ठेवी त्यांना परत मिळाव्यात या उद्देशाने ही योजना सुरु झाली आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतल्या सुधारणा २२ तारखेपासून लागू झाल्या आहेत. त्यात शैक्षणिक साहित्याबाबत केलेल्या कर सुधारणांविषयी आज जाणून घेऊया….

**होल्ड व्हीसी**

*(विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या दरात शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावं यासाठी सरकारने शैक्षणिक साहित्यावरील जीएसटी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार वही, ग्राफबुक, शार्पनर आणि पेन्सिल यांच्यावरील १२ टक्के जीएसटी कमी करून तो पाच टक्के करण्यात आला आहे. तसंच खोडरबरवरचा ५ टक्के जीएसटी रद्द करून तो शून्य करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कंपास पेटी, कलर बॉक्स यांच्यावरील जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के झाला आहे. या वस्तूंचे दर कमी झाल्यामुळे पालकांवरील आर्थिक ताण कमी होणार असून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.)*

**<><><><><>**

उद्या आश्विन शुद्ध दशमी म्हणजे विजयादशमी- दसरा. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असा हा सण संपूर्ण देशभरात साजरा करण्यात येतो. राज्यात शारदीय नवरात्रौत्सवाचं उत्थापन होऊन या दिवशी सीमोल्लंघन साजरं केलं जातं. सार्वजनिक स्वरूपात साजरा होणाऱ्या नवरात्रौत्सवातल्या देवीमूर्तींचं विसर्जन केलं जातं. विविध राजकीय पक्षांचे दसरा मेळावेही या दिवशी होतात. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी ‘जागतिक अहिंसा दिन’ म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्त उद्या अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी समारंभ उद्या नागपूरच्या मुख्यालयात होणार आहे.

**<><><><><>**

६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उद्या नागपूरमध्ये साजरा होणार आहे. या निमित्तानं भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी नागपूरमध्ये येत आहेत. नागपूरच्या दीक्षाभूमीत एकोणसत्तराव्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त उद्या मुख्य सोहळा होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूरचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते आज दीक्षाभूमी परिसरातील मुख्य सोहळ्याच्या ठिकाणी पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला त्यांनी पुष्पहार अर्पण केला. दीक्षाभूमीत काल पासूनच विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अनुयायांच्या सोयीकरिता नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, मध्य रेल्वे तसंच नागपूर मेट्रो रेल्वेनं देखील सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त नवी दिल्लीच्या आंबेडकर भवनात आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी झाले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं राष्ट्र उभारणीतलं आणि संस्कृती संवर्धनातलं योगदान याबद्दल त्यांनी आपल्या भाषणात कौतुक केलं. एका विशेष टपाल तिकीटाचं आणि नाण्याचं प्रकाशन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंह शेखावत तसंच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार परिवर्तन आणि प्रगतीसाठी अथक परिश्रम घेत आहे. आजच्या सेवा पर्वमध्ये जाणून घेऊया भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरच्या सक्षमतेविषयी....

**व्हीसी**

*(जागतिक घडामोडींमध्ये प्रभावशाली राष्ट्र म्हणून आज भारत उदयाला येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचा जागतिक पातळीवर सहभाग वाढला आहे. ग्लोबल साऊथबरोबरच्या सौहार्दपूर्ण संबंधांतून भारताचा जागतिक प्रश्नांबाबत सक्रिय सहभाग दिसून आला आहे आणि कोरोना काळात लसपुरवठ्याच्या माध्यमातून ते पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. राष्ट्रीय हितसंबंध आणि धोरणात्मक स्वायत्ततेचा सिद्धांत हे भारताच्या बहुपक्षीय सहभागाच्या केंद्रस्थानी*

*आहेत. ब्रिक्स, क्वाड, शांघाय सहकार्य संघटना अशा मंचांवरचा भारताचा सहभाग हा याच धोरणांचं संतुलन दर्शवतो. विविध राष्ट्रांना भेडसावणाऱ्या राष्ट्रीय तसंच सागरी सुरक्षा, तंत्रज्ञान सहकार्य, दहशतवाद अशा विविध मुद्द्यांवर घेतलेल्या ठाम भूमिकांमुळे भारताची जागतिक पातळीवरची प्रतिमा उंचावली आहे. )*

**<><><><><>**

जर्मनीचे वाणिज्यदूत ख्रिस्तोफ हॅलियर यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्र–जर्मनी सहकार्याच्या विद्यमान प्रकल्पांचा आढावा, महाराष्ट्र–बॅडन वुर्टेम्बर्ग भागीदारी, कौशल्य स्थलांतर आणि व्यावसायिक प्रशिक्षण कराराची प्रगती, तसंच भाषा प्रशिक्षणासह विविध विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुक्यातल्या मौजे मरकणारमधल्या ग्रामस्थांनी काल झालेल्या ग्रामसभेत माओवाद्यांना गावबंदी करणारा ऐतिहासिक ठराव एकमतानं मंजूर केला. सोबतच, एक भरमार बंदूकही पोलिसांकडे सुपूर्द केली. जानेवारी २०२४ पासून भामरागड तालुक्यातल्या ४० गावांनी माओवाद्यांना गावबंदी केली आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं सरकारी अधिकारी आणि कर्मचारी तसंच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३ टक्के वाढवला आहे. यामुळं महागाई भत्ता ५८ टक्के होईल. १ जुलैपासून हे दर लागू होतील अशी माहिती केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. देशात ५७ नवे केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचा निर्णयही सरकारनं घेतला आहे.

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं श्रीलंकेचा ५९ धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली. भारतानं ४७ षटकांमध्ये २६९ धावा

केल्या. अमनज्योत कौरनं ५७ धावा करून भारताची बाजू मजबूत केली. पावसामुळे सामन्यात व्यत्यय आल्यामुळं भारताची धावसंख्या २७० अशी निश्चित करून श्रीलंकेपुढे विजयासाठी २७१ धावांचं आव्हान ठेवण्यात आलं होतं. मात्र, श्रीलंकेचा संघ ४५ षटकं आणि चार चेंडूंमध्ये सर्वबाद २११ धावाच करू शकला. आता भारत आणि पाकिस्तान संघांदरम्यानचा बहुप्रतिक्षित सामना कोलंबोमध्ये रविवारी होणार आहे.

//<><><><><>//